॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Phone : (02462) 215525 DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT Website: srtmun.ac.in
Fax : (02462) 215572
E-mail: dir.dsd@srtmun.ac.in

जा.क्र./वि.वि.वि/२०२४-२५/१३९

दिनांक : ०९/१२/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर.
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, पेठ, लातूर.
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, परभणी.
मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
मा. समन्वयक कै. उत्तमराव राठोड आदीवासी विकास व संशोधन केंद्र किनवट.

विषय : दि. १० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून साजरा करणे बाबत.
संदर्भ : १) मा. सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.एचआरसी ०२०५/संकीर्ण-२११/पाल-१४, दिनांक ०८/१२/२००५
२) मा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांचे पत्र दिनांक ०९/१२/२०२४.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, दि. १० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून साजरा करण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ मधील कलम १२ अन्वये मानवी हक्का बाबत जनजागृती करणे हा राज्य मानवी हक्क आयोगाचा महत्वपूर्ण अविभाज्य भाग आहे. त्यानुसार समाजातील तळागाळापर्यंत जनतेला मानवी हक्काचे ज्ञान माहिती होणे व त्याबददल जनजागृती होण्यासाठी उक्त शासन निर्णय व पत्रकात नमुद केल्यानुसार कार्यक्रमाचे आयोजन करून सहकार्य करावे, ही विनंती.

डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग

श्री. अजय दर्शनकार, सीस्टीम एक्सपर्ट, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **परिपत्रक दि. 10 डिसेंबर मानवी हक्क दिवस साजरा करणे बाबत** या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home page मधील Administration and Students' Development सदराअंतर्गत प्रसिध्द करावे.

## जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

वेब साईटः- www.Nanded.gov.in
ई-मेलः- nandedrdc@gmail.com
फॅक्स क्रमांकः- ०२४६२-२३८५०
दुरध्वनी क्रमांकः- ०२४६२-२३५०७७
शाखाः- सामान्य शाखा-२
जा.क्र.२०२४/टे-१२/जपुती/सीआर-
दि. ०९/१२/२०२४

प्रति,

(१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड,
(२) मा.आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड,
(३) मा.पोलीस अधिक्षक, नांदेड,
(४) मा.कुलसचिव, स्वा. रा. ती. म. वि. नांदेड,
(५) मा. प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड,
(६) सहा. आयुक्त, समाजकल्याण कार्यालय नांदेड,
(७) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जि.प.नांदेड,
(८) प्रकल्प संचालक, ग्रामीण विकास यंत्रणा नांदेड,
(९) शिक्षणाधिकारी, माध्यमिक/प्राथमिक जि.प. नांदेड,
(१०) कारागृह अधिक्षक, नांदेड जिल्हा कारागृह, वर्ग- २,
(११) अधिक्षक, निरीक्षकगृह / बालसुधारगृह, नांदेड.

**विषयः- दिनांक १० डिसेंबर, हा दिवस मानवी हक्क दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

संदर्भः-१. मा.सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.एचआरसी-०२०५/संकीर्ण-२११/पोल-१४, दि.८ डिसेंबर, २००५

उपरोक्त संदर्भीय विषयांकीत प्रकरणी, मा.सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.एचआरसी-०२०५/संकीर्ण-२११/पोल-१४, दि.८ डिसेंबर, २००५ ची छायांकित प्रत पाठवून शासन निर्णयानुसार दिनांक १० डिसेंबर, हा दिवस **"मानवी हक्क दिन"** म्हणून साजरा करण्याबाबतच्या सुचना निर्गमित केल्या आहेत.

त्या अनुषंगाने मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ मधील कलम १२ अन्वये मानवी हक्काबाबत जनजागृती करणे हा राज्य मानवी हक्क आयोगाचा महत्वपुर्ण अविभाज्य भाग आहे. सदरील कायद्या अतंर्गत समाजातील तळागाळापर्यंत जनतेला मानवी हक्काचे ज्ञान माहित होणे व त्याबद्दल जनजागृती होण्यासाठी व्याख्यान / भाषणे इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

प्रकरणी उक्त शासन निर्णय व पत्रकात नमुद केल्यानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुखांना प्रत्येक कार्यालयात वरील प्रमाणे **दिनांक १० डिसेंबर, २०२४ हा दिवस "मानवी हक्क दिन"** म्हणून साजरा करण्याबाबतच्या सुचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अनुपालन अहवाल मा.आयोगास व या कार्यालयास सादर करण्यात यावा, ही विनंती.

जिल्हाधिकारी नांदेड करीता

प्रतिलिपी माहितीस्तव

१) मा. अपर मुख्य सचिव, राज्य मानवी हक्क आयोग, ९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रतिलिपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.**

१) उपविभागीय अधिकारी, नांदेड/भोकर/हादगाव/धर्माबाद/किनवट/देगलूर/कंधार/बिलोली.
२) तहसीलदार, नांदेड/अर्धापूर/भोकर/मुदखेड/हदगाव/हिमायतनगर/धर्माबाद/उमरी/किनवट/माहूर/मुखेड/देगलूर/कंधार / लोहा/बिलोली/नायगांव.
३) शिक्षणाधिकारी, माध्यमिक / प्राथमिक जिल्हा परिषद नांदेड.
४) कारागृह अधिक्षक, नांदेड जिल्हा कारागृह, वर्ग-२, उस्माणशाही मिल रोड नांदेड.
५) अधिक्षक, निरीक्षकगृह/बालगृह (मुलांचे) नांदेड, कमला नेहरु कन्या शाळेसमोर, श्रध्दा कॉलनी नांदेड.
६) जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव व प्रसिध्दीस्तव.

जिल्हाधिकारी नांदेड करीता

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

वेब साईटः- www.Nanded.gov.in
फॅक्स क्रमांकः- ०२४६२-२३८५०
शाखाः- सामान्य शाखा-२
ई-मेलः- nandedrdc@gmail.com
दुरध्वनी क्रमांकः- ०२४६२-२३५०७७
जा.क्र.२०२४/टे-१२/जपुती/सीआर-
दि. ०९ /१२/२०२४

प्रति,

(१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड,
(२) मा.आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड,
(३) मा.पोलीस अधिक्षक, नांदेड,
(४) मा.कुलसचिव, स्वा. रा. ती. म. वि. नांदेड,
(५) मा. प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड,
(६) सहा. आयुक्त, समाजकल्याण कार्यालय नांदेड,
(७) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जि.प.नांदेड,
(८) प्रकल्प संचालक, ग्रामीण विकास यंत्रणा नांदेड,
(९) शिक्षणाधिकारी, माध्यमिक/प्राथमिक जि.प. नांदेड,
(१०) कारागृह अधिक्षक, नांदेड जिल्हा कारागृह, वर्ग- २,
(११) अधिक्षक, निरीक्षकगृह / बालसुधारगृह, नांदेड.

**विषयः- दिनांक १० डिसेंबर, हा दिवस मानवी हक्क दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

संदर्भः-१. मा.सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.एचआरसी-०२०५/संकीर्ण-२११/पोल-१४, दि.८ डिसेंबर, २००५

उपरोक्त संदर्भीय विषयांकीत प्रकरणी, मा.सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.एचआरसी-०२०५/संकीर्ण-२११/पोल-१४, दि.८ डिसेंबर, २००५ ची छायांकित प्रत पाठवून शासन निर्णयानुसार दिनांक १० डिसेंबर, हा दिवस **"मानवी हक्क दिन"** म्हणून साजरा करण्याबाबतच्या सुचना निर्गमित केल्या आहेत.

त्या अनुषंगाने मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ मधील कलम १२ अन्वये मानवी हक्काबाबत जनजागृती करणे हा राज्य मानवी हक्क आयोगाचा महत्वपुर्ण अविभाज्य भाग आहे. सदरील कायद्या अतंर्गत समाजातील तळागाळापर्यंत जनतेला मानवी हक्काचे ज्ञान माहित होणे व त्याबद्दल जनजागृती होण्यासाठी व्याख्यान / भाषणे इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

प्रकरणी उक्त शासन निर्णय व पत्रकात नमुद केल्यानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुखांना प्रत्येक कार्यालयात वरील प्रमाणे **दिनांक १० डिसेंबर, २०२४ हा दिवस "मानवी हक्क दिन"** म्हणून साजरा करण्याबाबतच्या सुचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अनुपालन अहवाल मा.आयोगास व या कार्यालयास सादर करण्यात यावा, ही विनंती.

स्वा/-
जिल्हाधिकारी नांदेड करीता

**प्रतिलिपी माहितीस्तव**

१) मा. अपर मुख्य सचिव, राज्य मानवी हक्क आयोग, ९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रतिलिपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.**

१) उपविभागीय अधिकारी, नांदेड/भोकर/हादगाव/धर्माबाद/किनवट/देगलूर/कंधार/बिलोली.
२) तहसीलदार, नांदेड/अर्धापूर/भोकर/मुदखेड/हदगाव/हिमायतनगर/धर्माबाद/उमरी/किनवट/माहूर/मुखेड/देगलूर/कंधार / लोहा/बिलोली/नायगांव.
३) शिक्षणाधिकारी, माध्यमिक / प्राथमिक जिल्हा परिषद नांदेड.
४) कारागृह अधिक्षक, नांदेड जिल्हा कारागृह, वर्ग-२, उस्माणशाही मिल रोड नांदेड.
५) अधिक्षक, निरीक्षकगृह/बालगृह (मुलांचे) नांदेड, कमला नेहरु कन्या शाळेसमोर, श्रध्दा कॉलनी नांदेड.
६) जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव व प्रसिध्दीस्तव.

जिल्हाधिकारी नांदेड करीता

दिनांक १० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क
दिन म्हणून साजरा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.एचआरसी-०२०५/संकीर्ण-२११/पोल-१४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक : ८ डिसेंबर, २००५

वाचा : सचिव, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.एसएचआरसी/१२/०५/प्रशा/१६१४,
दि.१.१२.२००५

प्रस्तावना :- मानवी अधिकाराबाबत होणाऱ्या उपेक्षेस पायबंद घालण्यासाठी व मूलभूत मानवी अधिकार, मानवी व्यक्तीहिताची जन्मजात प्रतिष्ठा, योग्यता आणि स्त्री-पुरुषांचे समान हक्क तसेच त्यास भाषण स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, भय व अभावापासून मुक्ती अशी सर्वसाधारण लोकांची सर्वोच्च आकांक्षा शाबूत राहण्यासाठी, संयुक्त राष्ट्राच्या परिषदेमध्ये १० डिसेंबर, १९४८ रोजी मानवी अधिकाराची सार्वभौम घोषणा करण्यात आली.

भारतीय संविधानाच्या भाग-तीन मधील मूलभूत हक्क याखाली बहुतेक मानवी हक्कांची गणना करण्यात आलेली आहे. सदर मानवी हक्क हे एकरुप, सार्वत्रिक, अविभाज्य, संपूर्ण अनन्य संक्राम्य, स्वाभाविक व मूलभूत स्वरूपाचे आहेत. कोणत्याही सुसंस्कृत समाजातील लोकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे व ते वृद्धिंगत करणे ही प्रगतीशील लोकशाही सरकारची मुख्य जबाबदारी आहे. सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे समाजाच्या स्थैर्यतेला व शांततेला झालेला धोका तसेच अन्य बाबींमुळे मानवी हक्कांच्या सुरक्षिततेबाबत निरनिराळ्या घटनात्मक तसेच विधीविषयक तरतुदी असूनही अनेक लोकांकडून त्यांच्या मानवी हक्कांपासून वंचित करण्याबाबतच्या व उल्लंघनाबाबतच्या तक्रारी होत असतात. याबाबत सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन व राष्ट्रीय मानवी हक्क आयोग तसेच केंद्र शासनाने केलेल्या शिफारशीनुसार राज्यात मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ कलम २१ च्या तरतुदीनुसार राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. त्यानुसार सदर आयोगाची दि.१५.९.२००० रोजी स्थापना करण्यात आली.

समाजातील दारिद्र्य, विषमता, भेदभाव, पिळवणूक, छळ, इत्यादी कारणांमुळे नागरी, सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक बाबींसंदर्भातील मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये

म्हणून, सर्वांना समान संधी सुनिश्चित करण्यासाठी अशा उल्लंघनाची चौकशी व अन्वेषणाचे कार्य आयोगामार्फत करण्यात येते.

**शासन निर्णय** :- समाजाच्या विविध घटकांमध्ये मानवी हक्कविषयक शिक्षण वाढीस लागण्यासाठी व सर्वसामान्य लोकांमध्ये मानवी हक्क संस्कृती निर्माण होण्यासाठी १० डिसेंबर हा दिवस "मानवी हक्क दिन" म्हणून राज्यात कायमस्वरुपी साजरा करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

यासंदर्भात शासन असे आदेश देत आहे की, १० डिसेंबर हा दिवस प्रत्येक वर्षी "मानवी हक्क दिन" म्हणून साजरा करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सदाशिव शिवदास )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्राल, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (तात्काळ प्रसिद्धीसाठी)
कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान कक्ष, मंत्रालय, मुंबई (२ प्रती वेबसाईटसाठी)
निवड नस्ती.

# MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION, MUMBAI

9, Hajarimal Somani Marg, Opp. C.S.T. Station, Mumbai – 400001.
Tel: 2203 42 33/2207 64 08, Fax: 22091804, Website: www.mshrc.maharashtra.gov.in


**In the service of Citizens: Established in 2000, the *MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION* is functioning.**

**The Commission's role in promoting and protecting Human Rights is contained in the Protection of Human Rights Act, 1993.**

**<u>Promoting Human Rights:</u>**

- **Many Conferences, Seminars held in collaboration with NHRC, Universities etc regarding awareness of human rights. Recently a Conference as well as Seminar on 'HUMAN RIGHTS EDUCATION' was held in August, 2010, February, 2012 & 2013 and the recommendations made in these conference and seminars are being examined by authorities concerned.**

**<u>Protecting Human Rights:</u>**

- **The Commission has made recommendations in over cases to appropriate authorities.**
- **Wherever necessary Independent Inquiry is conducted in the field by the Investigation Wing of the Commission.**

***<u>Complaints which ARE Admissible</u>***

- Are by persons whose human rights is violated
- Can be of any person on behalf of the person whose human rights are violated
- However such complaints have to be only against any Public Servant, Government Servant of the State of Maharashtra who
  - violated someone's human rights
  - abetted violation of human rights
  - neglected to prevent violation of human rights

***<u>Complaints NOT Admissible</u>***

- Vague, anonymous, frivolous, trivial, illegible.
- Event occurred more than one year earlier
- Civil disputes, Service Matters, Family Matters, Labour Disputes
- Pending in Courts, Commissions, Tribunals.
- Complaints addressed to others with copy to MSHRC.
- Alleged violation of human rights by Government servants of Government of India
- Allegations that are not against any Public Servant/Government Servants.
- Do not make any specific violations of
- Human Rights

***<u>What to Mention in Complaint</u>***

- Address to Chairperson/Secretary, MSHRC
- Name and Address of the Complainant/Victim and perpetrator
- Location of event
- Date and Time of occurrence
- Description of Human Rights Violated
- Complaint against whom
- In case pending in Courts, Tribunals.

- No Fees Required
- No need to engage Lawyer.
- Complainant can personally place his/her complaint

2

*'The STATE is bound to PROTECT your HUMAN RIGHTS'*

*Protect your Human Rights !    Defend Human Rights of others !*

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपति शिवाजी टर्मिनस (व्हीटी) समोर, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी : २२०३ ४२३३ • फॅक्स : २२०९ १८०४

नागरीकांच्या सेवेसाठी सन २००० या वर्षी स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग कार्यन्वीत आहे. मानवी हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन याबाबतची आयोगाची भुमिका मानवी संरक्षण अधिनियम, १९९३ मध्ये स्पष्ट केलेली आहे.

## मानवी हक्कांचे संवर्धन -

- मानवी हक्काची जागृकता निर्माण करण्याच्या दृष्टीने अनेक चर्चासत्र, कार्यशाळा इत्यादी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या व विद्यापिठांच्या सहकार्याने आयोजित केल्या गेल्या आहेत. अलिकडेच मानवी हक्कांचे शिक्षण या विषयावर ऑगस्ट, २०१० तसेच फेब्रुवारी २०१२ व २०१३ मध्ये चर्चासत्रे आयोजित केलेली होती. त्या अनुषंगाने दिलेल्या शिफारशींवर संबंधीत प्राधिका-यांकडून अभ्यास केला जात आहे.

## मानवी हक्कांचे संरक्षण -

- आयोगाने आतापर्यंत पेक्षा जास्त शिफारशी संबंधित प्राधिका-यांकडे केलेल्या आहेत.
- त्याशिवाय आवश्यकतेनुसार अन्वेषण विभागाकडून घटनास्थळी जावून स्वतंत्र चौकशी सुध्दा केलेल्या आहेत.

### स्विकारल्या जाणा-या तक्रारी -

- ज्याच्या मानवी हक्क भंग झालेला आहे.
- मानवी हक्कांचा भंग झालेल्या कोणत्याही व्यक्तीच्या वतीने
- तथापि सदर तक्रार लोकसेवक / शासकीय सेवका विरूध्द असणे आवश्यक आहे.
  ज्यांचे कडून --
  १. दुस-यांच्या मानवी हक्कांचा भंग झालेला आहे.
  २ मानवी हक्कांचा भंग करण्यास प्रोत्साहन दिले गेलेले आहे.
  ३. मानवी हक्कांचे संरक्षण करण्यास दुर्लक्ष केले गेले आहे.

### कोणत्या तक्रारींची दखल घेतली जात नाही -

१. मोघम / निनावी / खोटया नावाने / बेकायदेशीर/ दिशाभूल करणा-या / शुल्लक तक्रारी.
२. हक्कांचे उल्लंघन झाल्यावर एक वर्षाच्या विलंबाने दाखल केलेल्या
३. नोकरी / दिवाणी दाबीशी संबंधीत असलेल्या किंवा कामगार / औद्योगिक विवादाशी संबंधीत असलेल्या
४. न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या तक्रारी
५. इतर कोणत्याही अधिका-यांस संबोधिलेल्या परंतु प्रत म्हणून आयोगास पाठविलेल्या
६. केंद्र शासनाच्या सेवकांशी संबधित तक्रारी
७. सरकारी अधिका-यांच्या विरूध्द नसलेली तक्रार
८. ज्या आरोपातुन विशिष्ट मानवी हक्कांचा भंग होत नसेल.

### तक्रारीत काय नमूद करावे -

१. अर्ज अध्यक्ष/सचिव यांचे नावे असणे आवश्यक आहे.
२. तक्रारदार/बाधित आणि ज्यांनी अत्याचार केला त्याचे नाव व पूर्ण पत्ता
३. घटनास्थळ
४. घटनेचा दिनांक व वेळ
५. मानवी हक्कांचे उल्लंघन विषयक माहिती
६. तक्रार कोणाविरूध्द आहे त्याचे नाव
७. प्रकरण न्यायालयात / न्यायाधिकरणात प्रलंबित आहे का

कोणतेही शुल्क आकारले जात नाही.
वकीलाची आवश्यकता नाही.
तक्रारदार आपली बाजू स्वतःमांडू शकतात

## शासन तुमचे मानवी हक्क अबाधित ठेवण्यासाठी बांधील आहे.

तुमच्या मानवी हक्कांचे संरक्षण करा

दुस-याच्या मानवी हक्कांसाठी लढा

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई. दुरध्वनी - ०२२ - २२०९२८५७**

**http://www.mshrc.online/**

### अनुच्छेद 19

प्रत्येक व्यक्तीला आपले मत आणि त्याच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे. यात कुठल्याही हस्तक्षेपाविना मतस्वातंत्र्य बाळगण्याचा आणि कुठल्याही सीमा न लागू होता कोणत्याही माध्यमातून माहितीचा शोध घेणे, ती मिळवणे आणि ती माहिती व कल्पना देण्याचा हक्क आहे.

### अनुच्छेद 20

(1) प्रत्येकाला शांतिपूर्ण सभा आणि समिती करण्याचा अधिकार आहे.

(2) कुठल्याही संस्थेचे सदस्यत्व कुणावरही लादले जाऊ शकत नाही.

### अनुच्छेद 21

(1) प्रत्येकाला आपल्या देशाच्या शासनात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्याद्वारे भाग घेण्याचा अधिकार आहे.

(2) प्रत्येकाला आपल्या देशातील शासकीय सेवेत प्रवेश घेण्याचा समान अधिकार आहे.

(3) जनतेच्या इच्छेवर शासन आधारलेले असेल. ही इच्छा वेळोवेळी आणि प्रत्यक्ष निवडणुकांतून प्रगट होईल.निवडणुका सार्वभौम आणि समान मताधिकाराद्वारे होतील आणि गुप्त मतदान वा अन्य समान स्वतंत्र मतदान प्रक्रियेनुसार घेतल्या जातील.

### अनुच्छेद 22

समाजाच्या प्रत्येक सदस्याला सामाजिक सुरक्षिततेचा अधिकार आहे; प्रत्येकाला राष्ट्रीय प्रयत्न आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य तसेच प्रत्येक राज्यसंस्थेतील अनुकूल साधने, आत्मप्रतिष्ठा व आपल्या व्यक्तित्वाचा स्वतंत्र विकास यासाठी अनिवार्यतेने आवश्यक असलेले आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकार प्राप्त आहेत.

### अनुच्छेद 23

(1) प्रत्येक व्यक्तीला काम करण्याचा, इच्छेनुसार रोजगार मिळवण्याचा, आणि कामासाठी न्याय्य व सुविधाजनक परिस्थिती प्राप्त करण्याचा आणि बेकारीपासून संरक्षण असण्याचा अधिकार आहे.

(2) प्रत्येकाला समान कामासाठी कुठल्याही भेदभावाविना समान दाम मिळण्याचा हक्क आहे.

(3) काम करण्याऱ्या प्रत्येक माणसाला योग्य आणि अनुकूल मजुरी मिळण्याचा अधिकार आहे ज्यामुळे तो आणि त्याचे कुटुंब मानवी सन्मानाला उचित अशी आजिविका प्राप्त करुन घेऊ शकेल आणि गरज पडल्यास त्याची पूर्ती इतर सामाजिक संरक्षणाद्वारे होईल.

(4) प्रत्येकाला व्यावसायिक संघटना निर्माण करण्याचा आणि त्यांचे सदस्य होण्याचा अधिकार आहे.

### अनुच्छेद 24

प्रत्येक व्यक्तीला विश्रांती आणि सुटीचा अधिकार आहे. यात कामाचे उचित तास आणि वेळोवेळी मिळणाऱ्या पगारी सुट्यांचा समावेश आहे.

### अनुच्छेद 25

प्रत्येक व्यक्तीला, त्याला आणि त्याच्या कुटुंबाला स्वास्थ देणारा आणि कल्याणकारी असा जीवनस्तर लाभण्याचा अधिकार आहे. यात अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सेवा आणि आवश्यक सामाजिक सेवा व बेकारीच्या काळातील सुरक्षेचा अधिकार, आजार, अपंगत्व, वैधव्य, वृद्धापकाळ, आजिविकेचे साधन नसण्याचे आपल्या काबूबाहेरील कारण, अशा परिस्थितीत संरक्षणाचा अधिकार आहे.

### अनुच्छेद 26

प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा अधिकार आहे. मूलभूत आणि प्राथमिक शिक्षण निःशुल्क असेल. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असेल. व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षण सर्वसाधारणपणे उपलब्ध असेल आणि योग्यतेच्या आधारावर उच्च शिक्षणाची समान संधी सर्वांना मिळेल.

### अनुच्छेद 27

(1) प्रत्येकाला समाजातील सांस्कृतिक घडामोडीत भाग घेण्याचा, कलांचा आस्वाद घेण्याचा, तसेच वैज्ञानिक प्रगती आणि त्यापासून प्राप्त होणाऱ्या सुखसोयींचा लाभ घेण्याचा अधिकार आहे.

(2) प्रत्येक व्यक्तीला तिने निर्मिलेल्या वैज्ञानिक, साहित्यिक वा अन्य कलाकृतिपासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या नैतिक आणि आर्थिक हिताची सुरक्षा करण्याचा अधिकार आहे.

### अनुच्छेद 28

प्रत्येकाला, या घोषणेत उल्लेखिलेले अधिकार आणि स्वातंत्र्ये पूर्णतया साकार होऊ शकतील अशी सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्था प्राप्त होण्याचा अधिकार आहे.

### अनुच्छेद 29

(1) प्रत्येकाचे व्यक्तिमत्व ज्या समाजात स्वातंत्र्याचा अनुभव घेऊ शकते आणि संपूर्ण विकास पावू शकते त्या समाजाप्रत त्याचे दायित्व आहे.

(2) आपले अधिकार आणि स्वातंत्र्य यांचा विनियोग करताना प्रत्येक व्यक्तीवर कायद्यानुसार केवळ तेवढीच बंधने राहतील ज्यामुळे दुसऱ्याचे अधिकार आणि स्वातंत्र्य याबद्दल निश्चित जाणीव आणि योग्य आदर अबाधित राहील आणि लोकशाही समाजातील नैतिकता, लोक–प्रशासनव्यवस्था आणि सर्वसामान्यांचे कल्याण या न्याय्य अपेक्षा पूर्ण होतील.

(3) या अधिकारांचा आणि स्वातंत्र्याचा उपयोग कुठल्याही प्रकारे संयुक्त राष्ट्राचे सिद्धांत आणि उद्दिष्टे यांच्याविरुद्ध केला जाणार नाही.

### अनुच्छेद 30

या अधिकारनाम्यात उल्लेखिलेल्या कुठल्याही बाबतीत असा अन्वय काढणे अयोग्य ठरेल की ज्यापासून कुठलेही राज्य, गट किंवा व्यक्तीला इथे उल्लेखिलेले कुठलेही अधिकार वा स्वातंत्र्याचा नाश करण्याचे प्रयत्न वा अशा प्रयत्नात सामील होण्याचा अधिकार आहे.

**It is both the duty and responsibility of the world's fortunate few to help fulfill the legitimate unfortunate many.**

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग




# मानवाधिकारांची सार्वभौम घोषणा

## (Universal Declaration of Human Rights-1948)

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

९, हजारीमल सोमाणी मार्ग,
सी. एस. टी. स्टेशन जवळ, मुंबई–४००००१
फोन–([illegible]२) २२०७ ३४३४, २२०३ ४२३३, २२०१ २८५७
फॅक्स–(०२२) २२०१ १८०४, २२०१ ३६७८

# मानवाधिकारांची सार्वभौम घोषणा

## उपोद्घात

ज्यास्तव मानव परिवारातील सर्व सदस्यांची जन्मजात प्रतिष्ठा आणि त्यांच्या समान तथा अविभाज्य अधिकारांची जाणीव ही विश्वातील स्वातंत्र्य, न्याय आणि शांतीची मुहूर्तमेढ आहे.

ज्यास्तव मानवी अधिकारांबाबत उपेक्षा आणि घृणा यातून मनुष्य समाजाच्या सदसद्विवेक बुध्दीचा तळ ढवळून काढणारी अश्लाघ्य कृत्ये घडून आलेली आहेत आणि अशा एका दुनियेचा आगम--जेथे लोकांना भाषण स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य आणि भय व अभावापासून मुक्ती असेल, ही सर्वसाधारण लोकांची सर्वोच्च आकांक्षा म्हणून घोषित करण्यात आलेली आहे,

ज्यास्तव, जर मानवाला अगदी शेवटचा उपाय म्हणून अन्यायकारी शासन आणि जुलुमाविरूद्ध विद्रोह करून उठणे आनिवार्य व्हायचे नसेल तर मानवी अधिकारांचे कायदेशीर नियमांनी संरक्षण करणे आवश्यक आहे,

ज्यास्तव, सर्व राष्ट्रांतील मैत्रीचे संबंध वाढीस लागावे,

ज्यास्तव संयुक्त राष्ट्रांच्या जनतेने या अधिकारनाम्यात मूलभूत मानवी अधिकार, मानवी व्यक्तित्वाची जन्मजात प्रतिष्ठा आणि योग्यता आणि स्त्री पुरूषाचे समान हक्क या विषयी आपला विश्वास पुनःर्घोषित केलेला आहे आणि हा निश्चय केलेला आहे की सामाजिक प्रगती आणि अधिक व्यापक स्वातंत्र्यात जीवनस्तर उंचावला जाईल.

ज्यास्तव सदस्य राष्ट्रांनी ही प्रतिज्ञा केली आहे की, ते संयुक्त राष्ट्रांच्या सहकार्याने मानवी अधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्याप्रत सार्वभौम गौरव भावनेचे संवर्धन करतील,

ज्यास्तव या अधिकारांचा आणि स्वातंत्र्याचा योग्य परिचय होणे हे या प्रतिज्ञेला संपूर्ण न्याय देण्यासाठी सर्वाधिक महत्वाचे आहे.

यास्तव, आता,

**सर्वसाधारण सभा**

पुकारते

**ही मानवाधिकारांची सार्वभौम घोषणा**

जी सर्व लोकांसाठी आणि सर्व राष्ट्रांच्या नागरिकांसाठी सफलतेचा एक समान मापदंड असेल, यांचा उद्देश असा आहे की, प्रत्येक व्यक्ती आणि समाजातील प्रत्येक घटक ही घोषणा निरंतर मनात बाळगून, अध्यापन आणि शिक्षणाव्दारा सतत हे अधिकार आणि स्वातंत्र्य यांच्या प्रती आदर वाढीस लागावा म्हणून प्रागतिक स्वरूपाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ध्येयधोरणे आखून त्यांना सार्वत्रिक आणि प्रभावकारक मान्यता लाभावी आणि त्यांचे आचरणात पालन व्हावे यासाठी, दोहोंमध्ये, सदस्य राष्ट्रांची जनता आणि त्यांच्या प्रशासनाखालील जनतेमध्ये सदैव प्रयत्नशील राहतील.

### अनुच्छेद 1

सर्व मनुष्यमात्रांना जन्मजात स्वातंत्र्य आणि समान प्रतिष्ठा प्राप्त झालेली असते. त्यांना तारतम्य, आणि सद्सद्विवेकबुध्दी आणि आंतरात्म्याची देण मिळालेली असते आणि त्यांनी परस्परांशी बंधुभावे व्यवहार केले पाहिजेत.

### अनुच्छेद 2

या अधिकारनाम्यात निहीत असलेले सर्व अधिकार आणि स्वातंत्र्ये प्राप्त करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे, आणि याबाबतीत [illegible] जात, रंग, लिंग, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर विचारप्रणाली, राष्ट्रीय वा सामाजिक स्थान, धनसंपत्ती, विशिष्ट कुळात जन्म वा इतर अशा कोणत्याही मर्यादान्वये भेदभाव केला जाणार नाही.

तसेच, कुठल्याही राजकीय, प्रशासकीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या राष्ट्रातील किंवा प्रदेशातील व्यक्तिमात्रांमध्ये भेदभाव केला जाणार नाही मग ते राष्ट्र वा प्रदेश स्वतंत्र असो, सुरक्षित, स्वशासनरहीत असो अगर तेथे अन्य कोणत्याही प्रकारे परिमित प्रभुसत्ता असो

### अनुच्छेद 3

प्रत्येक जणास जीवन,स्वाधीनता आणि वैयक्तिक सुरक्षेचा अधिकार आहे

### अनुच्छेद 4

कुणालाही गुलामी वा वेठबिगारीत ठेवले जाणार नाही. गुलामी प्रथा आणि कुठल्याही प्रकारातील गुलामांचा व्यापार निषिध्द असेल.

### अनुच्छेद 5

कुणालाही शारीरिक यातना दिल्या जाणार नाहीत. आणि ना कुणाशी निर्दय, अमानुष वा अपमानकारक व्यवहार वा शिक्षा केली जाईल.

### अनुच्छेद 6

प्रत्येकास प्रत्येक ठिकाणच्या कायदयासमोर व्यक्ती म्हणून उभे राहण्याचा अधिकार आहे

### अनुच्छेद 7

कायदयासमोर सर्व समान आहेत आणि सर्वांना कुठल्याही भेदभावाविना कायदयान्वये समान संरक्षणाचा हक्क आहे. या घोषणेचे उल्लंघन करून जर भेदभाव केला गेला अथवा अशा प्रकारच्या भेदभावासाठी जर काही प्रकारे उद्युक्त केले गेले तर त्या भेदभावाविरूध्द समान संरक्षणाचा अधिकार सर्वांना प्राप्त आहे.

### अनुच्छेद 8

कायदयाने अथवा संविधानानुसार प्राप्त झालेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले असता प्रत्येकाला समुचित राष्ट्रीय न्याय संस्थेकडून उचित भरपाई मागण्याचा अधिकार आहे.

### अनुच्छेद 9

कुणालाही जुलुमाने कैद,स्थानबध्द किंवा हद्दपार केले जाणार नाही.

### अनुच्छेद 10

प्रत्येकाला त्याच्या अधिकार आणि कर्तव्यासंबंधाने अथवा त्याच्यावरील फौजदारी स्वरूपाच्या आरोपासंबंधाने न्यायोचित आणि सार्वजनिक सुनावणी,निरपेक्ष आणि निष्पक्ष न्यायसंस्थेपुढे होण्याचा अधिकार आहे.

### अनुच्छेद 11

(1) प्रत्येक व्यक्ती, जिच्यावर दंडनीय अपराधाचा आरोप करण्यात आलेला आहे, तोवर, निरपराधी मानली जाईल जोवर आपल्या बचावासाठी आवश्यक अशा सोयी तिला निःपक्षपाती न्यायालयात प्राप्त झालेल्या असतील आणि कायद्यासमोर तिला अपराधी म्हणून शाबित केले नसेल.

(2) कुठलीही व्यक्ती कोणत्याही अशा कृत वा अकृत बाबीमुळे अशा दंडनीय अपराधाची अपराधी मानली जाणार नाही, ज्याला त्या काळी प्रचलित राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार दंडनीय अपराध मानले गे[illegible] आणि ज्या वेळेस तो दंडनीय अपराध केला गेला तेव्हा जेवढी दंडाची शिक्षा होत असेल त्यापेक्षा तिला अधिक दंड करता येणार नाही.

### अनुच्छेद 12

कुठल्याही व्यक्तीची खाजगी बाब, परिवार, घर वा पत्रव्यवहार याबाबतीत कुणाचाही मनःपूत हस्तक्षेप खपविला जाणार नाही आणि तिचा सन्मान व ख्याती यावर कुठला आक्षेप घेता येणार नाही. असे हस्तक्षेप वा आक्षेपाविरूध्द प्रत्येकाला कायदेशीर संरक्षणाचा अधिकार आहे.

### अनुच्छेद 13

(1) प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक देशाच्या सीमांतर्गत स्वयंपूर्णतेने येण्याचा, जाण्याचा अन् स्थायिक होण्याचा अधिकार आहे.

(2) प्रत्येक व्यक्तीला आपला वा परका कुठलाही देश सोडून आपल्या देशात परत यायचा हक्क आहे.

### अनुच्छेद 14

(1) प्रत्येक जणास सतावले गेले असता दुसऱ्या देशांमध्ये आसरा घेण्याचा आणि वास्तव्याचा अधिकार आहे.

(2) हा अधिकार त्या मामल्यांमध्ये मिळणार नाही, जे खरोखर गैर राजनैतिक अपराधांशी संबंधित आहेत वा जे संयुक्त राष्ट्राचे उद्देश्य आणि सिद्धांतांच्या विरूद्ध आहेत.

### अनुच्छेद 15

(1) प्रत्येक व्यक्तीला राष्ट्रीयतेचा अधिकार आहे.

(2) कुणालाही वाटेल त्या मार्गाने त्याच्या राष्ट्राच्या नागरिकत्वापासून वंचित केले जाणार नाही वा आपल्या राष्ट्राचे नागरिकत्व बदलण्यापासून परावृत्त केले जाणार नाही.

### अनुच्छेद 16

(1) सज्ञान वयाच्या स्त्री पुरूषांना कुठलीही जात, राष्ट्रीयता वा धार्मिक मर्यादा आड न येता एकमेकांशी विवाह करून परिवार स्थापण्याचा अधिकार आहे. त्यांना विवाहाबाबत, वैवाहिक जीवनात आणि घटस्फोटाच्या बाबतीत समान अधिकार आहेत.

(2) विवाहाचा इरादा बाळगणाऱ्या स्त्री पुरूषांचा संपूर्ण आणि स्वतंत्र सहमतीनुसारच विवाह होईल.

(3) परिवार हा समाजाचा नैसर्गिक आणि मूलभूत घटक आहे आणि त्याला समाज व राज्याकडून संरक्षण मिळविण्याचा अधिकार आहे.

### अनुच्छेद 17

(1) प्रत्येकाला एकट्याने आणि इतरांसमवेत मालमत्ता बाळगण्याचा हक्क आहे.

(2) वाटेल त्या प्रकारे आपल्या मालमत्तेपासून कुणाला वंचित केले जाणार नाही.

### अनुच्छेद 18

प्रत्येक व्यक्तीला विचार, बुद्धी आणि धार्मिक स्वातंत्र्य आहे. यानुसार आपला धर्म वा धार्मिक विश्वास बदलण्याचा आणि एकट्याने वा इतरांसमवेत, तसेच सार्वजनिक रूपाने अथवा खाजगीपणे आपला धर्म पालन करण्याचा आणि धार्मिक शिक्षण, आचार, उपासना यातून आपल्या श्रद्धा प्रगट करण्याचा अधिकार आहे.